# माहिती हवीय?

**भरत चंद्रकांत कालुवाल**, माहीम कॉजवे, मुंबई.

**□ *कारवाँ* या चित्रपटात जितेंद्रच्या मित्राची व खलनायकाची भूमिका करणारा अभिनेता कोण?**

— मित्राची भूमिका करणारा अभिनेता रवींद्र कपूर. खलनायकाची भूमिका करणारा अभिनेता किशन मेहरा.

**□ *रात के अंधेरे में* हा चित्रपट कधी प्रदर्शित झाला होता? निर्माता-दिग्दर्शक-संगीतकार व कलाकार कोण?**

— *रात के अंधेरे में* या नावाचे दोन चित्रपट आतापर्यंत आले आहेत. १९७१ मध्ये पहिला चित्रपट आला होता. अशोक खन्ना या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक होते. संगीतकार: प्रेमधवन. कलाकार: देवकुमार, सोनिया साहनी, एन. ए. अन्सारी, तिवारी. १९८७ मध्ये दुसरा *रात के अंधेरे में* आला होता. निर्माता: दिग्दर्शक: विनोद तलवार, संगीत: सुरिंदर कोहली, जावेद खान, दीपिका, मजहर खान, इस्तीहाज खान या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते.

**□ *स्वीकार* हा चित्रपट केव्हा आला होता? निर्माता-दिग्दर्शक-कलाकार व संगीतकार कोण?**

— *स्वीकार* १९७३ ला आला होता. निर्माता: सी. डी. शाह, हरीश उपाध्याय, दिग्दर्शक: सुरेन्द्र रॉय, संगीत: लक्ष्मीकांत-प्यारेलाल, कलाकार: महेन्द्र संधू, हंसा मेकर, नमिता कपूर, हंगल.

**रविकांत साखरे**, जामखेड.

**□ गुरूदत्तनी एखाद्या चित्रपटाचे नृत्यदिग्दर्शन केलं होतं काय?**

— प्रभातच्या *लाखारानी* या चित्रपटाचं नृत्यदिग्दर्शन त्यांनी केलं होतं.

**□ रवी नगाईच यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता?**

— रवी नगाईच यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट *फर्ज*.

**विलास भोसले**, कोल्हापूर.

**□ अनंत मानेंचा *सुशीला* हा चित्रपट सत्यकथेवर आधारलेला होता काय?**

— होय. कोल्हापुरातील अयोध्या, प्रभात रॉयल, शाहू, पद्मा या चित्रपटगृहांच्या परिसरात सिनेमा तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या एका स्त्रीच्या जीवनावर हा चित्रपट आधारलेला होता.

**मारुती गणपत कोळी**, नवघर.

**□ कबीर बेदीचा पहिला चित्रपट?**

— कबीर बेदीचा पहिला चित्रपट *हलचल*.


**सागर अनंत कोळी**, नवघर.

**□ विद्या सिन्हाचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण?**

— विद्या सिन्हाचा पहिला चित्रपट *राजाकाका*. नायक किरणकुमार.

रविकांत साखरे, जामखेड.

**□ डेव्हिडनी कोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली होती काय?**



बूटपॉलिशमध्ये मध्यवर्ती भूमिकेत डेव्हिड

— नाही. *बुटपॉलिश, मेम दीदी* या चित्रपटात त्यांनी मध्यवर्ती भूमिका केली होती. *बुटपॉलिश*साठी त्यांना सर्वश्रेष्ठ सहाय्यक अभिनेत्याचे फिल्म फेअर पारितोषिक मिळाले होते.

**अनिकेत मारूती कोळी**, नवघर.

**□ वैजयंतीमालाचा पहिला आणि शेवटचा चित्रपट कोणता?**

— पहिला चित्रपट *बहार* आणि शेवटचा *गवार*.

**□ निम्मीचा पहिला चित्रपट कोणता?**

— निम्मीचा पहिला चित्रपट *बरसात*.

**अशोक वा. कोर्टीकर**, पंढरपूर.

**□ 'प्यार की राह दिखा दुनियाको रोके जो नफरत की आंधी...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील? गीतकार-संगीतकार व कलाकार कोण?**

— १९६० च्या *लंबे हाथ* या चित्रपटात हे गाणं होतं. गीतकार: अंजान, संगीतकार: जी. एस. कोहली, कलाकार: मेहमूद, नाज, डेझी ईराणी, नाझी, मृदुला, राजन हकसर.

**□ अरुणा ईराणी कोणकोणत्या चित्रपटात बालकलाकार होती?**

— *सोने की चिडीयाँ, गंगा जमुना, सरहद्द* या चित्रपटात.

**□ खलनायक म्हणून आपल्या रुपेरी जीवनाची सुरुवात करून नंतर यशस्वी नायक बनलेले अभिनेते कोण?**

— चंद्रमोहन, ईश्वरलाल, याकूब, बाबूराव पेंढारकर, रमेश देव, रजनीकांत, विनोद खन्ना, शत्रुघ्न सिन्हा, शाहरूख खान.

**□ जावेद अख्तरने कोणत्या हिंदी चित्रपटासाठी पहिल्यांदा गाणी लिहिली?**

— जावेद अख्तरने *सिलसिला* या हिंदी चित्रपटासाठी पहिल्यांदा गाणी लिहिली.

**□ राजा गोसावीने कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली? नायिका कोण?**

— *लाखाची गोष्ट* (रेखा), *बोलविता धनी* (चित्रा), *गंगेत घोडं न्हालं* (रेखा), *आंधळा मागतो एक डोळा* (स्मिता), *दिसतं तसं नसतं* (रेखा), *गाठ पडली ठका ठका* (स्मिता), *काही खरं नाही* (प्रतिभा), *पसंत आहे मुलगी* (रेखा), *आलिया भोगासी* (जयश्री गडकर), *घरचं झालं थोडं* (नलिनी चोणकर), *झाकली मूठ* (रेखा), *नवरा म्हणू नये आपला* (स्मिता), *झालं गेलं विसरून जा* (शशिकला), *दोन घडीचा डाव* (स्मिता), *गुरूची विद्या गुरूला* (विद्या), *राजा गोसावीची गोष्ट* (सुनंदा गोसावी, नीलम, नलिनी बोरकर. या चित्रपटात राजाभाऊंची भूमिका तिहेरी होती.) *यंदा कर्तव्य आहे* (शशिकला), *राजमान्य राजश्री* (सीमा), *याला जीवन ऐसे नाव, अवघाची संसार* (जयश्री गडकर), *लग्नाला जातो मी* (नीलम), *पैशाचा पाऊस* (जयश्री गडकर, रेखा), *संगत जडली तुझी न माझी* (जीवनकला), *बाप माझा ब्रह्मचारी* (जयश्री गडकर), *चिमण्यांची शाळा* (सीमा), *प्रीतिविवाह* (जयश्री गडकर), *श्रीमान बाळासाहेब* (वंदना तथा आशा नाडकर्णी), *वाट चुकलेले नवरे* (कामिनी कदम पूर्वीची स्मिता), *कामापुरता मामा* (सुजाता), *सुधारलेल्या बायका* (कामिनी कदम), *अति शहाणा त्याचा* (रत्ना), *चला उठा लग्न करा* (भारती मालवणकर), *गुरुकिल्ली* (संजीवनी), *शेरास सव्वाशेर* (कामिनी कदम), *दैव जाणिले कुणी, काका मला वाचवा* (उमा), *येथे शहाणे राहतात* (भारती मालवणकर), *नसती उठाठेव* (सरला येवलेकर), *असला नवरा नको ग बाई* (रंजना) या चित्रपटात. ●